# नाट्येतिहास लेखनातील काही समस्या

प्रभाकर नारायण परांजपे

नाटकाचे मिश्रकलास्वरूप हेच नाट्येतिहास लेखनातील प्रमुख समस्या निर्माण करते. या इतिहास-लेखकाला नाटकाचा रंगभूमीशी असलेला संबंध धड डोळ्याआड करता येत नाही आणि धड त्याच्याकडे डोळे भरून पाहत बसणेही परवडत नाही. म्हणजे या इतिहासलेखकाला नाटकाच्या लिखित रूपावर लक्ष केंद्रित करावे लागते पण हे लिखित रूप सिद्ध होण्यात रंगभूमीच्या अनेक घटकांचा हातभार लागला आहे, याचेही भान राखावे लागते. हे साध्य करायचे तर रंगभूमीच्या घटकांच्या नाट्यलेखनावरील संस्कारासंबंधीचे फक्त निष्कर्ष व त्यांची उदाहरणे देऊन भागवावे लागते. (हाच प्रकार त्याला राजकीय-सामाजिक संस्कारांबाबतही करावा लागेल.) अशा निष्कर्षासाठी त्याला डॉ. भालेराव स्मृतिग्रंथातील के. नारायण काळे व बापूराव नाईक यांचे लेख उपयोगी पडतील.

नाट्येतिहास लेखनावरील दुसरी समस्या म्हणजे तो वर्णनपर असावा की मूल्यमापनावर असावा ही. वर्णनपर इतिहासामध्ये अभिप्रेत काळातील सर्व प्रवाहांचा, नाटककारांचा समावेश करण्यावर भर असेल तर मूल्यमापनपर इतिहासामध्ये मुख्य प्रवाह ठरवून त्यावर भर देण्यात येईल, व इतरांना तुलनात्मक दृष्ट्या गौण स्थान मिळेल. कथा, कादंबरी या साहित्यप्रकारांचा इतिहास मूल्यमापनपर असावा ही गोष्ट मान्य झालेली आहे. (उदा. धार आणि काठ, मराठी कादंबरीचे पहिले शतक हे अनुक्रमे कुरुंदरकर व कुसुमावती देशपांडे यांनी लिहिलेले इतिहास.) नाट्येतिहास वर्णनपर असावा की मूल्यमापनपर हे ठरवले की मग बाल नाट्य, गिरणगावी नाटक, प्रायोगिक-व्यावसायिक नाटक, संगीत नाटक इ. ना इतिहासात काय स्थान असावे याबद्दलचे निर्णय घेता येतील.

नाट्येतिहास नाटकांच्या कालानुक्रमाच्या अनुषंगाने लिहावा की नाटककारांच्या अनुषंगाने लिहावा ही नाट्येतिहास लेखनातील तिसरी समस्या. सैद्धान्तिक दृष्ट्या नाटकांच्या कालानुक्रमाच्या अनुषंगाने नाट्येतिहास लिहिला जाणे योग्य वाटते. असे झाले तर पु. ल. देशपांडे, तेंडुलकर, कानेटकर हे कसे खरोखरी समकालीन आहेत हे वाचकांच्या लक्षात येईल. एवढेच नव्हे तर नाट्यरूपात होत गेलेले बदलही आयसोलेटेड् नसून परंपरा व परिस्थितीसापेक्ष कसे असतात हे लक्षात येईल. पण या पद्धतीने नाट्येतिहास (किंबहुना कुठल्याही साहित्य प्रकाराचा इतिहास) लिहिला गेला आहे असे दिसत नाही. सर्व साधारणपण तो नाटककार सापेक्ष किंवा नाट्यप्रकार सापेक्ष असतो असं दिसते. 'इतिहास' (=असे घडले) हे नाव सार्थ व्हायचे तर मात्र तो नाट्य-कृतीसापेक्ष लिहिला जाणे आवश्यक आहे. उदाहरणार्थ १९४७ ते १९८० पर्यंतच्या नाट्येतिहासामध्ये एकेका वर्षात रंगभूमीवर आलेल्या, प्रकाशित झालेल्या नाटकांच्या अनुषंगाने इतिहास लिहिला जायला हवा.

नाट्येतिहास लेखनातील आणखी एक समस्या अशी की अनेक नाटकं रंगभूमीवर सादर केली जातात, पण ती मुद्रित होतातच असे नाही. त्याचप्रमाणे अनेक नाटकं लिहिली जातात पण त्यांचा प्रयोग होतोच असे नाही. अशा नाटकांच्या बाबतीत इतिहास लेखकाने कोणते धोरण बाळगायचे? उदाहरणार्थ 'जुलूस' किंवा अच्युत वझे, दिलीप जगताप यांच्या नाटकांची इतिहासात दखल घ्यायची की नाही? घेतल्यास ती कशी घ्यायची? अप्रकाशित व अप्रयोगित नाटकांचा समावेश बनहट्टींनी नाट्येतिहासात केलेला आढळेल. हे कितपत योग्य आहे?

शेवटची समस्या अशी की नाट्येतिहासलेखकाकडे कोणती क्वॉलिफिकेशन्स असली पाहिजेत? किंबहुना खरी समस्या या क्वॉलिफिकेशन्सची हायरार्की कोणती? कारण आदर्श नाट्येतिहासलेखकाच्या क्वॉलिफिकेशन्सची आपल्याला एक यादी करता येईल. पण ती

(पान २० वर)





तडकपणे वा लाग्याबांध्यांमधून कसं पडलं आहे हे स्पष्ट केलं जात नाही की त्याविरुद्ध उठवलेलं बंड नाटकात कुठे आणि कसं प्रत्ययास येतं त्याचा विचार होत नाही.

विशिष्ट समाजरचनेतली जुलमी मूल्यव्यवस्था आणि तिच्याविरुद्ध उठवलेलं बंड ह्याच एकमेव संदर्भात नाटक पाहिल्यामुळे त्याचे इतर स्तर वा पैलू साफ दुर्लक्षिले जातात. केवळ मृत्यूबद्दलचं हळुवार चिंतन, स्त्री-पुरुष संबंध अन् त्यातल्या अटळ उणिवा, मृत्यू-सारख्या चिरंतन गोष्टीकडे पहाण्याचा पिढीफरकामुळे बदलत जाणारा दृष्टिकोन, जुन्या मूल्यांचं विडंबन होत असतानाच त्याबद्दलची ओढही तितकीच खरी आणि अपरिहार्य असते ह्याचं भाऊंच्या स्मशानाबद्दलच्या स्वगतातून होणारं दर्शन—ह्यासारख्या अनेक गोष्टींना ह्या विवेचनात मुळीसुद्धा स्थान नाही.

परंतु अशा असंख्य उणिवा असूनही ही एक दखल-पात्र पुस्तिका आहे. कारण एकूण सामाजिक घडा-मोडींच्या विस्तृत संदर्भचौकटीमध्ये एखाद्या नाटकाचा विचार करण्याचा प्रयत्न होतो ही बाबच अत्यंत स्वागतार्ह आहे.

□

**'विसाव्या शतकाचे 'महानिर्वाण''**, **लेखक :** कुमार केतकर, **प्रकाशन :** ग्रंथाली, **पृष्ठसंख्या :** डेमी ३२, **किंमत :** दोन रुपये.

## साभार पोच

**'बॅरिकेड'** : (नाट्यसंहिता), मूळ लेखक : उत्पल दत्त, मराठी अनुवाद : दिलीप ठाकुरदेसाई, मागोवा प्रकाशन, १२५९/२, जं. म. रस्ता, पुणे ४११ ००४, पृष्ठे ८८, किंमत तीन रुपये.

**'उत्सव'** : (नाट्यसंहिता), लेखक : प्रभाकर दुपारे, प्रकाशक : प्रभाकर दुपारे, चंद्रमणी नगर, पो. पार्वती नगर, नागपूर २७, पृष्ठे ४०, किंमत तीन रुपये.

(पान १२ वरून)

इमारतीला आतून किंवा बाहेरून रंग दिलेला नाही. कॉंक्रीटच्या रंगाची गंमत तशीच ठेवली आहे. कॉंक्रीट ओतण्याकरता बांधलेल्या फळ्या मुद्दाम त्यांच्या ग्रेन साठी निवडल्या आहेत. त्यामुळे आतल्या आणि बाहेरच्या भिंतीवर एक पॅटर्न तयार झाला आहे.

डेनिस लॅसडनूने केलेला विचार आणि त्याची तळमळ त्याच्या शब्दात दिसते. तो म्हणतो :

The National Theatre has come about through hundreds and hundreds of people willing it into being—that's why it is there— ....And it has finally come about at a most poignant moment when architecture has to serve drama !

□

(पान १३ वरून)

सर्व गुणवत्ता अंगी असलेला माणूस शोधून काढणे अशक्यप्राय ठरेल. पण वेगवेगळी क्वॉलिफिकेशन्स असलेली वेगवेगळी माणसे उपलब्ध असण्याची शक्यता आहे. अशावेळी कोणती क्वॉलिफिकेशन्स अधिक महत्त्वाची हा प्रश्न महत्त्वाचा ठरतो. नाटकाची जाण, नाटकाचे साहित्यमूल्य व प्रयोगमूल्य यांच्यात फरक करता येण्याची क्षमता, रंगभूमीच्या स्वरूपाची व परंपरेची समज; चित्रपटादी मास मीडिया, चित्रकला, शिल्पकला इ. ची ओळख, बृहत् (मॅक्रो) व सूक्ष्म (मायक्रो) विद्वत्ता (स्कॉलरशिप), तुलना करण्याची क्षमता, पर्स्पेक्टिव्ह व मर्मदृष्टी (क्रिटिकल इन्साइट) आणि नाट्यसमीक्षा लेखनाचा पूर्वानुभव ही झाली नाट्येतिहास लेखकाची क्वॉलिफिकेशन्स. या क्वॉलिफि-केशन्सबद्दल दुमत होणार नाही असे गृहित धरावयास हरकत नाही. पण यातली कोणती क्वॉलिफिकेशन्स अधिक महत्त्वाची हे ठरवणे मात्र अवघड आहे आणि त्यावर मतैक्य होणे दुरापास्त आहे. □